| | | |
|---|---|---|
| NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र | आरोग्य सेवा<br>**राष्ट्रीय आरोग्य अभियान, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग** | बेटी बचाओ save the girl child |

# जाहीर प्रस्ताव

**विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान नागरी आरोग्यवर्धीनी केंद्र करीता भाडेतत्त्वावर इमारतीची जागा निश्चित करणे करीता Expression of Intrest (स्वारस्य अभिव्यक्ती) प्रस्ताव सादर करणे बाबत...**

रायगड जिल्हा परिषद - राष्ट्रीय आरोग्य अभियान मंजुर असलेल्या नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रांकरीता भाडेतत्त्वावर इमारतीच्या जागेची (सदनिका / दुकान गाळा) नेमणूक करणेची आहे. तरी खालील तक्त्यामध्ये नमुद तालुक्यांतील इच्छुक सदनिका / दुकान गाळा मालकांनी आपल्या जागेचे एकूण क्षेत्रफळ स्क्वेअर फुट प्रमाणे सर्व कागदोपत्री तपशिल राष्ट्रीय आरोग्य अभियान, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथे **सदस्य सचिव जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, रायगड तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग** यांच्या नावे दिनांक १३/०१/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावा.

| अ.क्र | तालुके | एकुण युनिट | स्क्वेअर फुट (क्षेत्रफळ) |
|---|---|---|---|
| १ | महाड नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र | 2 संस्था | किमान ५०० |
| २ | म्हसळा नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र | 1 संस्था | किमान ५०० |
| ३ | खालापूर नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र (नगरपालिका खोपोली हद्दीमध्ये अथवा खालापूर नगरपंचायत हद्दीमध्ये) | 2 संस्था | किमान ५०० |
| ४ | अलिबाग नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र | 2 संस्था | किमान ५०० |
| ५ | मुरुड नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र | 1 संस्था | किमान ५०० |

जागेचे प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे -

| तपशिल | दिनांक |
|---|---|
| जागा प्रस्ताव जाहीरात प्रसिद्ध दिनांक | ०२/०१/२०२६ |
| जागा प्रस्ताव स्विकृतीचा अंतिम दिनांक | १३/०१/२०२६ सायंकाळी ५.३० पर्यंत |

**अटी व शर्ती**

१. उपरोक्त जागा प्रस्ताव हे सर्व करांसहित असावेत.
२. विहित मुदतीमध्ये प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारण्यात येतील, उशिराने किंवा कालावधी नंतर कार्यालयात प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
३. प्रस्ताव हे सिलबंद स्वरुपात पाठवावीत.
४. जागेच्या प्रस्तावासोबत नगरपालिका ताबापावती, करपावती, ना हरकत दाखला, जोडणेत यावा.

५. सदयास्थिती ९ संस्था भाडे स्वरुपात घेण्याचे असून आवश्यकते नुसार संख्या कमी किंवा जास्त करण्याचे अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकरी, रा.जि.प., अलिबाग यांना राखुन ठेवण्यात आले आहेत.

६. सदर जागा निश्चित करणेकरीता भाडे दर हे बाजार भावाप्रमाणे असावेत.

७. जागा मालकाने निविदेतील अटी व शर्तींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर दंड आकारण्यात येईल.

८. निविदा शर्ती व अटींचे पालन न केल्यास पुर्व सुचना न देता निविदा रद्द करण्यात येईल.

९. प्रत्येक महिन्याचे भाडे हे पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित वैद्यकिय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर प्रत्यक्ष निश्चित दराने तयार करुन पुढील महिन्याच्या १० तारखेच्या आत कार्यालयात देणे आवश्यक आहे. वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित करुन निधी उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी केली जाईल.

१०. भाडे तत्वावर घेण्यात आलेले जागा आवश्यकतेनुसार रंगविण्यात येईल व स्टिकर्स लावण्यात येतील.

११. भाडेतत्त्वावर घेणेत येणा-या इमारतीची डागडुजी अथवा दुरुस्ती इमारत मालकाने स्वतःच्या खर्चाने करावयाचा आहे.

१२. **कागदपत्रे खालीलप्रमाणे दरपत्रकासोबत सादर करावीत.**

**१. संबंधित सदनिका / दुकान गाळे मालकाचा विनंती अर्ज (अर्जामध्ये नाव व भाडेकरार करावयाच्या पत्ता नमुद असावा)**

**२. संबंधित कार्यालयाकडून इमारत बांधकामाचे वर्ष प्रमाणपत्र**

**३. मालकी दस्तऐवज (८ अ किंवा रजिस्ट्री प्रत) करपावती**

**४. संमती पत्र (सा.बां. जे भाडे ठरवून देईल ते मान्य असल्याबाबत इमारत मालक यांचे)**

**५. शपथ पत्र ( यापुर्वी या इमारतीचे भाडे करार अन्य व्यक्ती किंवा संस्थेसोबत करण्यात आलेले नाही असे शपथपत्र स्टॅंप पेपरवर नोटरी करुन)**

**६. ताबा पावती (इमारत मालक यांचे)**

**७. इमारत नकाशाची नील प्रत (घरमालक यांच्या सहीसह)**

**८. इमारतीचे आतील बाहेरील फोटो**

**९. चालू वर्षातील संबंधित जागेचे रेडी रेकनर दर सन २०२५-२६**

तरी वर नमुद तक्त्यातील तालुक्यातील सदनिका / दुकान गाळा संदर्भातील इच्छूक मालकांनी सील बंद लिफाफ्यामध्ये **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, कुंटे बाग, अलिबाग, जि.रायगड** येथे वरिल मुदतीत प्रस्ताव सादर करावे. दिनांक १३/०१/२०२६ नंतर सादर करणेत आलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. कृपया पुरवठादारांनी याची नोंद घ्यावी.

**अध्यक्ष,**
**जिल्हा एकात्मिक आरोग्य व**
**कुटुंब कल्याण सोसायटी, रायगड**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी ,**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**